जाक्र. मुंमप्र झोपुप्रा/अभि/अधिसूचना- 09 /२०२६

दिनांक: 05 JAN 2026

## अधिसूचना

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ब च्या पोटकलम (३) अनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने ठाणे महानगरपालिका क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करुन दिनांक १७ मार्च २०१६ रोजी **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिध्द केली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ (क) उप-कलम (१) अनुसार "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" घोषित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत.

आणि ज्याअर्थी, उक्त कलम ३ (क) चे उप-कलम (१) मधील शक्तीचा वापर करुन मी, खालील प्रमाणे अनुसूचीमध्ये दर्शविलेले क्षेत्र "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून दि.२२ एप्रिल २०१६ रोजी महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात क्रमांक झोपुप्रा/उजि-ठाणे/३क/साई एंटरप्राईजेस/२०१६/२७अ अन्वये घोषित केलेले असून, सदरचे क्षेत्र एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, महाराष्ट्र शासन (UDCPR-२०२०) अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन योजना" दाखल करण्यास पात्र आहे.

आणि ज्याअर्थी तत्कालीन मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये ४४ नागरी पुनरुत्थान आराखडा (यु.आर.पी.) अधिसूचित करुन दि.५ मे २०१८ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द केले असून, त्यामधील यु.आर.पी. क्र. ९ (सिध्देश्वर) मध्ये अंतिम भूखंड क्र.४३५, मौजे पांचपाखाडी, ता. जि. ठाणे या भूखंडाचा समावेश आहे.

आणि ज्याअर्थी, अंतिम भूखंड क्र.४३५, मौजे पांचपाखाडी, ता. जि. ठाणे या भूखंडावरील विकासक यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ (क) चे उप-कलम (१) अन्वये ४३४४.८८ चौ.मी. घोषित केलेले "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" अनधिसूचित/अघोषित करणेबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी, एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR-२०२०) मधील विनियम क्र. १४.७.४ अन्वये मला प्रदान अधिकारान्वये अंतिम भूखंड क्र.४३५, मौजे पांचपाखाडी, ता. जि. ठाणे या भूखंडाचे "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित केलेले खालील तक्त्यात नमूद क्षेत्र अनधिसूचित/अघोषित करीत आहे.

# अनूसुची

| अ. क्र. | गाव व अं.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र (चौ.मी.) | "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून जाहीर केलेले क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्वेस | पश्चिमेस | उत्तरेस | दक्षिणेस |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १. | मौजे-पांचपाखाडी, ठाणे. अं.भू.क्र. ४३५ | ५४२६.३० | ४३४४.८८ | अं.भू.क्र. ४३३ | अं.भू.क्र. ४३६ | नाला | अं.भू.क्र. ४३२ |
| | **एकूण क्षेत्र** | **५४२६.३०** | **४३४४.८८** | | | | |

मुंबई महानगर प्रदेश,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल,
मानपाडा, ठाणे (पश्चिम)-४०० ६१०.

संदीप माळवी
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**मुंबई महानगर प्रदेश**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

MMR, SLUM REHABILITATION AUTHORITY, THANE * GOVERNMENT OF MAHARASHTRA *

ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहाजवळ, खेवरा सर्कल, ग्लॅडी अल्वारीस रस्ता, मानपाडा, ठाणे (पश्चिम) - ४००६१०.
दुरध्वनी क्र.०२२-४१३५६८४०, Email ID- thane@sra.gov.in

No.:MMRSRA/ENG/Notification 01 /2026
Date : 05 JAN 2026

**NOTIFICATION**

Whereas, the Slum Rehabilitation Authority has formed Slum Rehabilitation Scheme for Thane Municipal Corporation Area under the provision of section 3B (3) of Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 and published in **Maharashtra Government Gazette** on dtd.17th March 2016;

And whereas, in view of the provision of Section 3C (1) of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act 1971, the Chief Executive Officer, Slum Rehabilitation Authority, is empowered to declare any area as "Slum Rehabilitation Area".

And whereas, in view of the said provision of section 3C (1) of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act 1971, I, the undersigned, hereby declared the area shown in schedule as "Slum Rehabilitation Area". In Gazette of Govt of Maharashtra as per No. SRA/Dy.Coll-Thane/3C/Sai Enterprize/2016/27A on dtd.22nd April 2016. A Scheme of Slum Rehabilitation can be submitted on the said area as per Unified Development Control And Promotion Regulations for Maharashtra State (UDCPR-2020).

And whereas, in pursuant to the provisions of erstwhile sanctioned Development control Regulations, 44 Urban Renewal Plans (hereinafter referred to as "URP") are notified in *Government Gazette* dated 5th May 2018 wihtin the limits of Thane Municipal Corporation; The Final Plot No.435, Village Panchpakhadi, Thane are included in U.R.P. No. 9 (Siddheshwar).

And whereas, Developer has requested that "Slum Rehabilitation Area" of Final Plot No.435, Village - Panchpakhadi, Ta. Dist. Thane admeasuring 4344.88 sq.mtrs. Declared /Notified under Clause No. 3(C)(1) of Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 by Slum Rehabilitation Authority shall be De-Notified / undeclared.

Now therefore, as per power conferred upon me vide Regulation No. 14.7.4 of UDCPR-2020, the "Slum Rehabilitation Area" declared in table given below of Final Plot No.435, Village - Panchpakhadi, Ta. Dist. Thane should decleared as De-Notified /Undecleared.

## *Schedule*

| S. No. | Village & F. P. No. | Area as per Property Card (Sq. Mtr) | Area decleared as "Slum Rehabilitation Area" (Sq.mtrs.) | Boundaries | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | East | West | North | South |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| 1. | Village-Panchpakhadi Thane. F. P. No. 435 | 5426.30 | 4344.88 | F. P. No. 433 | F. P. No. 436 | Nala | F. P. No. 432 |
| | **Total Area** | **5426.30** | **4344.88** | | | | |

Mumbai Metropolitan Region,
Slum Rehabilitation Authority,
Thane Municipal Corporation Market Building,
Near Dr. Kashinath Ghanekar Auditorium,
Khevra Circle, Manpada,
Thane (west) 400 610.

(Sandeep Malvi)
**Chief Executive Officer**
**MMR Slum Rehabilitation Authority**